# धुळे शहरातील घरेलू कामगारांची आर्थिक स्थिती - एक विश्लेषणात्मक अध्ययन.

**प्रा. डॉ. के. बी. दिवटे**

*उप प्राचार्य, मा. ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे.*

**गोषवारा :**

घरेलूकामागर हा रोजगार वाढीचा परिणामत: अर्थव्यवस्थेच्या विकासाचा एक महत्वाचा घटक बनलेला आहे.वाढत्या शहरीकरणामुळे आणि विभक्त कुटूंब पध्दतीमुळे घरेलू कामगारांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.त्यातुनच असंघटीत अशा घरेलू कामगारांबाबत मानवी तस्करीच्या आणि त्यांच्या शोषणाच्या विविध घटना समोर येत आहेत. त्यामुळे या घरेलू कामगारांची सामाजिक आणि त्यांच्या शोषणाच्या विविध घटना समारे येत आहेत.यामुळे या घरेलू कामगारांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे आणि त्यांना कायद्याचे संरक्षण मिळणे आज आवश्यक बाब बनली आहे .यासाठी राज्यनिहाय व शहरनिहाय घरेलू कामगारांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.याच हेतूने महाराष्ट्र राज्यातील धुळे शहारातील घरेलू कामगारांच्या सामजिक आणि आर्थिक स्थितीचा अध्यास केला आहे.

**प्रस्तावना**

घरेलू कामगार ही जुनी संकल्पना आहे. पुर्वी त्यांना "घरगडी" किंवा "नोकर"असे संबोधले जायचे. देशाचा आर्थिक विकास व शहरीकरण यामुळे शहरातील रोजगाराच्या संधी वाढल्या घरातील स्त्री नोकरीसाठी घराबाहेर पडू लागली.यामुळे घरेलू काम करण्यासाठी कामगारांची गरज भासू लागली.यातूनच घरेलू कामगारांना दिवसें दिवस मागणी वाढू लागली.आणि अशिक्षित व अकुशल स्त्री वर्गासाठी उत्पन्नाचे एक मुख्यसाधन म्हणून हे क्षेत्र उदयास आले. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या (NSSO)अहवाला नुसार (२००४-०५) , शहरी भागात काम करणाऱ्या एकूण ४७.५ लाख घरेलू कामगारांपैकी ३०.५ लाख महिला कामगार होत्या.यावरुन महिला कामगरांसाठी घरेलू काम हे क्षेत्र दिवसें दिवस वाढत असून या क्षेत्रात महिलांचा सहभागही दिवसें दिवस वाढत असल्याचे दिसून येते.

**संशोधनाचे महत्व :**

या संशोधनात मुख्यत:हा घरेलू कामगांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास आहे. देशातील उत्पादन, रोजगार वाढविण्यात घरेलू कामगार महत्वाची भूमिका पार पाडतात. परंतु समाजाच्या दृष्टीने घरेलूकामागार सतत दुर्लक्षित राहिलेले आहे. घरेलू काम हे मानवी आरोग्याच्या दृष्टीने खूप महत्वाचे आहे.या सर्व गोष्टीचा विचार केल्यास, घरेलू कामारांकडे समाजाचे व सरकारचे लक्ष वेधून या कामगारांच्या कष्टाला समकक्ष मोबदला मिळावा,त्यांच्या कष्टाची समाजाने नोंद घ्यावी, हया हेतूने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची उदिष्टे:**

१) घरेलूकामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहुतके :**

१) घरेलू कामगारांची आर्थिक स्थिती सुधारत आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत लघु संशोधनासाठी धुळे शहरातील ३५ घरेलू कामागारांची निवड " सरल यादृष्टिक नमुना निवड पध्दतीने " केली आहे.

**तथ्य संकलन :**

**१) प्राथमिक तथ्य :**

मुलाखत अनुसुचीच्या मदतीने घर कामागारांच्या प्राथमिक तथ्य संकलित केले. कामगारांमधील कमी साक्षरतेचे प्रमाण, तसेच प्रश्नावली भरुन देण्याची उदासीनता या बाबी विचारात घेऊन प्रश्नावली ऐवजी मुलाखत अनुसुचीच्या मदतीने तथ्य संकलित करण्यात आले.

**२) दुय्यम तथ्य :**

दुय्यम सामग्रीच्या स्वरुपातील तथ्य संकलित करण्यासाठी शासकीय विविध अहवाल, शासकीय राजपत्र, प्रकल्प अहवाल,पुस्तके, मासिके, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे इत्यादींचा वापर केलेला आहे.

**३) सामग्री संस्करण व विल्लेषण :**

मुलाखत अनुसचीच्या आधारे संकलित केलेल्या तथ्यांवर प्रक्रिया करुन सारणी, सूत्र टक्केवारी, सरासरी या संख्या शास्त्रीय साधनांच्या आधारे स्रोत निहाय विश्लेषण केले आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

१) हे संशोधन धुळे शहरातील निवडक घरेलू कामगारांपुरते मर्यादित आहे.

२) अधिकृत आकडेवारी उपलब्ध होण्यासंबधी मर्यादा असल्यामुळे ही सदर संशोधनाची देखील मर्यादा आहे.

**घरेलू कामगारांचा आर्थिक अभ्यास :**

व्यक्तिची आर्थिक स्थिती, त्यांचे उत्पन्न, राहणीमान, बचतीची सवय, कर्जाचा बोजा, इ. सारख्या बाबींवरुन समजते. म्हणूनच घरेलू कामगारांच्या कामाविषयी सविस्तर माहिती, त्याचा मासिक पगार, बोनस, कामाचा वेळ यासंबधित आकडेवारी गोळा केलेली आहे.गोळा केलेल्या आकडेवारी आधारे घरेलू कामगारांची आर्थिक स्थिती स्पष्टकरण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**१) कुटुंबातील कर्ती सदस्य संख्या :**

बरेच घरेलु कामगार हे दरिद्रयात जीवन जगत असतात. त्यामुळे घरातील पुरुषाप्रमाणे स्त्रीयांनाही उत्पन्न मिळविण्यासाठी घराकामसारखी कामे करावी लागतात.

**तत्का क्र.१ कामगारांच्या कुटुबातील कर्ती सदस्य संख्या**

| सदस्य संख्या | ०१ | ०२ | ०३ | ०४ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| कामगारांची संख्या | ०५ | १९ | ०८ | ०३ | ३५ |
| शेकडा प्रमाण | १४ | ५४ | २३ | ०९ | १०० |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तत्का क्र.१ वरुन असे दिसून येते कि, कुटूंबातील कर्ती सदस्य संख्या ०४ असणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०९%) आहे. घरेलू कामगार आपल्या मुलांना कामावर घेऊन जात नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

**२) दररोजची कामाची घरे :**

घरेलू कामगारांना विविध प्रकारची कामे करावी लागतात उदा. धुणं धुणे, भांडी घासणे , घर झाडणे व लादी पुसणे, घराची इतर साफसफाई करणे, स्वयंपाक करणे इत्यादी. या कामपासुन त्यांना कमी मोबदला मिळतो. त्यामुळे बहुतांश घरेलू

कामगारांना एकापेक्षा जास्त घरांमध्ये काम करावे लागते संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांना दररोज किती घरांमध्ये काम करावे लागते, या विषयी माहिती तत्का क्र.३ मध्ये दिलेली आहे.

**तत्का क्र.२ रोज काम करत असलेल्या घरांची माहिती.**

| घरांची संख्या | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कामगारांची संख्या | ०४ | ०३ | ०७ | ०७ | ०५ | ०५ | ०२ | ०२ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ११ | ०९ | २० | २० | १४ | ०१४ | ०६ | ०६ | १०० |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी.

तत्का क्र.२ वरुन असे दिसून येते कि, संशोधनासाठी निवडलेले कामगार रोज कमीत कमी ०१ व जास्तीत जास्त ०९ घरामध्ये काम करतात. रोज ०१ ते ०४ घरांमध्ये काम करणाऱ्या कामगाराचे प्रमाण सर्वात कमी (०७%) आहे.तसेच ८८% कामगाररोज ०१ ते ०६ घरामंध्ये काम करतात आणि फक्त १२% कामगाररोज ०६ पेक्षा जास्त घरांमध्ये काम करतात.थोडक्यात कुटुंबाचा दैनदिन खर्च भागविण्यासाठी काही घरेलू कामगारांना जास्त घरांमध्ये काम करावे लागते.

**३) प्रतिदिन कामाचे तास व मासिक पगार :**

घरेलू कामगारांचा मासिक पगार हा ते किती घरांमध्ये व कोणते काम करतात यावर अवलंबून असतो. इरत कामांच्या तुलनेत स्वयंपाक करणाऱ्या कामगारांना त्यांच्या कामाचा जास्त मोबदला मिळत असल्याचे दिसून आले.

**तक्ता क्र. ३ कामगरांचे प्रतिदिन कामाचे तास आणि मासिक पगार.**

| अ.क्र. | मासिक पगार (रु.) | कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १००० पर्यंत | ०२ | ०५.७१ |
| २ | १००१ - २००० | ०६ | १७.१४ |
| ३ | २००१ - ३००० | ११ | ३१.४३ |
| ४ | ३००१ - ४००० | ०८ | २२.८६ |
| ५ | ४००१ - ५००० | ०३ | ०८.५७ |
| ६ | ५००१ - ६००० | ०३ | ०८.५७ |
| ७ | ६००१ - ७००० | ०१ | ०२.८६ |
| ८ | ७००१ - ८००० | ०१ | ०२.८६ |
| | **एकुण** | **३५** | **१००** |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ३ वरुन असे दिसून येते की, रु. २००१/- ते रु. ३०००/- दरम्यान मासिक पगार मिळविणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त (३१.४३ %) आहे, तर मासिक पगार रु. ६०००/- च्या वर आणि रु. ८०००/- पर्यंत मिळवणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (प्रत्येकी ५.७२ %) आहे.

**४) जास्तीचे काम :**

घरेलू कामगारांना त्यांच्या ठरलेल्या कामाव्यतिरिक्त इतरही कामे कधी कधी करावे लागतात.

**तक्ता क्र. ४ कामगारांना करावे लागणारे जास्तीचे काम**

| तपशील | जास्तीचे काम करावे लागते | | जास्तीच्या कामचे कारण | | | | जास्तीच्या कामाचा मोबदला मिळतो | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | सण/समारंभ | पाहुणे येणे | सुट्टीचा दिवस | एकुण | होय | नाही |
| कामगारांची संख्या | २१ | १४ | ११ | ०८ | ०२ | २१ | ०९ | १२ |
| शेकडा प्रमाण | ६० | ४० | ५२ | ३८ | १० | १०० | ४३ | ५७ |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र.४ वरुन असे दिसून येते कि, संशोधनाठी निवडलेल्या घरेलू कामगारांपैकी सर्वाधिक ६० % कामगारांना जास्तीचे काम करावे लागते. जास्तीचे काम करावे लागणाऱ्या कामगारांपैकी सर्वात जास्त (५२ %) कामगारांना सण/समारंभाच्या वेळी जास्तीचे काम करावे लागते, तर सर्वात कमी (१० %) कामगारांना घर मालकांच्या सुट्टीच्या दिवशी जास्तीचे काम करावे लागते. परंतू फक्त ४३ % (०९) कामगारांना जास्तीच्या कामाचा मोबदला मिळतो, तर ५७ % (१२) कामगरांना जास्तीच्या कामाचा मोबदला मिळत नाही.

**५) बोनस :**

बोनस हा उत्पन्नाचा एक भाग मानला जातो. आज सर्वच संघटीत आणि असंघटीत कामगारांना बोनस मिळतो. किमान एक वर्ष सेवा झाली असेल तर, दिवाळीच्या वेळी मालकांनी घरेलू कामगारांना "एक महिन्याचा पगार " बोनस म्हणून देण्याची कायद्यात तरतूद आहे.

**तक्ता क्र. ५. कामगारांना मिळणारा बोनस**

| तपशील | बोनस मिळतो | | बोनस (रु.) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | १०० | २०० | ३०० | ५०० | ६०० | कपडे | एकुण |
| कामगारांची संख्या | ११ | २४ | ०२ | ०४ | ०२ | ०६ | ०१ | ०९ | २४ |
| शेकडा प्रमाण | ३१ | ६९ | ०८ | १७ | ०८ | २५ | ०४ | ३८ | १०० |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ५ वरुन असे दिसून येते की, संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी फक्त ११ (३१ %) कामगारांना बोनस मिळतो, तर २४ (६९ %) कामगारांना बोनस मिळत नाही. तसेच, नविन कपडे बोनस म्हणून मिळणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिकर (३८ %) आहे, रु. ६००/- बोनस म्हणून मिळणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी (०४ %) आहे आणि रु. ५००/- बोनस म्हणून मिळणाऱ्या कामगारांचे प्रमाण २५ % इतके आहे.

**६) पगार वाढ :**

संघटीत आणि असंघटीत अशा साधारणत: सर्वच कामगारांना दरवर्षी पगार वाढ देण्यास येते. संशोधनासाठी निवडलेल्या घरेलू कामगारांना मिळणाऱ्या पगार वाढी विषयी माहिती तक्ता क्र. ६ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६ कामगारांना मिळणारी दरमहा पगार वाढ**

| **तपशील** | **पगार वाढ मिळते** | | **पगार वाढ (रु.)** | | |
|---|---|---|---|---|---|
| | **होय** | **नाही** | ५० | २०० | एकूण |
| कामगारांची संख्या | ०८ | २७ | ०४ | ०४ | ०८ |
| शेकडा प्रमाण | २३ | ७७ | ५० | ५० | १०० |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ६ वरुन असे दिसून येते की, संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी फक्त ०८ (२३ %) कामगारांना दरवर्षी पगार वाढ मिळते, तर २७ (७७ %) कामगारांना दरवर्षी पगार वाढ मिळत नाही. तसेच, दरवर्षी पगार वाढ मिळणाऱ्या कामगरापैकी अर्ध्या (५० %) कामगारांना रु. ५०/- इतकी पगार वाढ मिळते आणि आर्ध्या (५० %) कामगारांना रु. २००/- इतकी पगार वाढ मिळते. घरेलू कामगार सतत मागणी करुनही त्यांना घरमालक पगार वाढ देत नाहीत, असे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले.

**७) दरमहा बचत :**

घरेलू कामगारांना दरमहा मिळाणरे उत्पन्न त्यांच्या कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी अपुरे पडत असते. तरी देखील आजारपणात औषधोपचारासाठी काही घरेलू कामगार बचत करत असतात.

**तक्ता क्र. ७ कामगारांच्या बचतीचे स्वरुप**

| तपशील | बचत करतात | | बचतीचे स्वरुप (रु.) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | १०० | २०० | ५०० | १००० | २००० | एकुण |
| कामगारांची संख्या | ०७ | २८ | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०७ |
| शेकडा प्रमाण | २० | ८० | १४.२९ | ४२.८६ | १४.२९ | १४.२८ | १४.२८ | १०० |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ७ वरुन असे दिसून येते की, संशोधनासाठी निवडलेल्या एकूण घरेलू कामगारांपैकी फक्त २० % कामगाराच बचत करतात आणि ८० % कामगार इच्छा असून देखील बचत करु शकत नाहीत. तसेच, बचत करत असलेल्या कामगारांपैकी सर्वाधिक ४२.८६ % कामगार रु. २००/- इतकी दरमहा बचत करतात, तर रु. १००/-, रु. ५००/-, रु. १०००/- व रु. २०००/- इतकी दरमहा बचत करणाऱ्या कामगारांचे प्रमाण प्रत्येकी १४.२८ % आहे.

**८) कर्ज :**

घरेलू कामगारांना कमी उत्पन्न मिळते. त्यामुळे दैनंदिन खर्च भागावनेही त्यांना कठीण जाते. म्हणून त्यांना त्यांच्या दैनंदिन खर्चा व्यतीरीक्तचा खर्च उदा. घराची दुरुस्ती करणे, कुटुंबाचा वैद्यकीय खर्च भागवणे, लग्न कार्य किंवा इतर कौटुंबिक कार्य पार पाडणे. इ. खर्च भागविण्यासाठी कर्ज काढावे लागते. घरेलू कामगारांच्या कर्जा विषयी माहिती तक्ता क्र. १० मध्ये दिलेल्या आहे.

**तक्ता क्र. ८ कामगारांच्या कर्जाबद्यल माहिती**

| तपशील | कर्ज घेतले | | कामगारांच्या कर्जाची रक्कम (रु. हजारात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आहे | नाही | ११-२० | २१-३० | ३१-४० | ४० < | एकुण |
| कामगारांची संख्या | १३ | २२ | ०४ | ०५ | ०२ | ०२ | १३ |
| शेकडा प्रमाण | ३७ | ३६ | ३०.७८ | ३८.४६ | १५.३८ | १५.३८ | १०० |

संदर्भ : क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. ८ वरुन असे दिसून येते की, संशोधनासाठी निवडलेल्या ३७ % कामगारांनी कर्ज घेतलेले आहे. तर सर्वाधिक ६३ % कामगारांनी कर्ज घेतलेले नाही. कर्ज घेतलेल्या कामगारांपैकी बहुतांश कामगारांनी बचत गटांकडून कर्ज घेतले असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले. तसेच, काही कामगारांनी २ ते ३ वेगवेगळे कर्ज घेतले असल्याचेही प्रत्यक्ष पाहणीत समजले. रु. २१ ते ३० हजार दरम्यान कर्ज घेतलेल्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (३८.४६ %) आहे आणि रु. ३० हजार पेक्षा जास्त व रु. २१ हजार पेक्षा कमी रक्कमेचे कर्ज घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण समान (प्रत्येकी ३०.७८ %) आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

१) कुटुंबातील कर्ती सदस्य संख्या दोन ते तीन असणाऱ्या कामगारांचे प्रमाण जास्त असून त्यापेक्षा जास्त सदस्य संख्या असणाऱ्या कामगारांचे प्रमाण कमी आहे.

२) एकुण घरेलु कामगारांपैकी ८८ % कामगार रोज १ ते ६ घरांमध्ये काम करतात. संख्यने कमी कामगारांना आपला दैनंदिन खर्च भागविण्यासाठी सहा घरांपेक्षा जास्त घरांमध्ये काम करावे लागते.

३) एकुण कामगारांपैकी ६० % पेक्षा जास्त कामगारांना नियोजित कामाव्यतिरीक्त जास्तीचे काम करावे लागते. मात्र सर्वच कामगारांना जास्तीच्या कामाचा मोबदला मिळत नाही.

४) एकुण कामगारांपैकी ७७ % कामगारांना ४००० रु पर्यंत उत्पन्न मिळते. यापेक्षा जास्त उत्पन्न मिळणाऱ्या कामगारांची संख्या कमी आहे.

५) जवळ जवळ ७० % कामगारांना बोनस मिळत नाही. बऱ्याच कामगारांना बोनस म्हणून कपडे दिली जातात.

६) फक्त २३ % कामगारांनाच वार्षिक पगारवाढ मिळते. ७७ % कामगारांना ही पगारवाढ मिळत नाही.

७) एकुण घरेलू कामगारांपैकी २० % कामगार बचत करतात. त्यातील जास्तीज जास्त कामगार दरमहा २०० रु. बचत करतात. ८० % कामगार इच्छा असूनही बचत करु शकत नाही.

८) एकुण कामगारांपैकी १/३ कामगारांनी कर्ज घेतले असून २/३ कामगारांनी कर्ज घेतले नाही. बहुतांशी कामगारांनी बचत गटामार्फत कर्ज घेतले आहे.

**संदर्भ :**


१) घरेलू कामगार कल्याण आणि सामाजिक सुरक्षितता कायदा, २०१०, भारत सरकार.

२) घरेलू कामगार कृती समितीचा अंतिम अहवाल, १२ सप्टेंबर, २०११ कामगार व रोजगार मंत्रालय, भारत सरकार.

३) डॉ. एस.जी.शिंदे, " असंघटीत क्षेत्रातील कामगार : मोलकरणींची स्थिती, " वाणिज्य विद्या, जर्नल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट थॉट - मराठी पुरक खंड ३, जुलै २०१४.

४) The Domestic Workers (Welfare and Regulation of Employment) Bill 2015, bill no. 21 of 2015, Government of India.

५) The Domestic Workers (Registration Social Security and Welfare) Act, 2008, Government of India.